ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!





## गोष्ट क्र. ३१

ज्याला worldly wise म्हणतात ते प्रबोधिनीत मी तसं फार शिकलो आहे असं वाटत नाही. पण त्यामुळे फार काही तोटा झाला असेही वाटत नाही. व्यवहार चतुर असणं आणि व्यवहार समजणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. व्यवहार चातुर्य मला प्रबोधिनीत त्यावेळेस मिळायला हवं होतं असही वाटत नाही. प्रबोधिनीत 'काय शिकायचं' याची पद्धत माहीत झाली. ज्ञानसंग्रह मात्र बाहेर पडल्यावर वाढवायला लागला. इतिहासाचा अभ्यास प्रबोधिनीमध्ये झाला होता. तो फार उपयुक्त ठरला. परंतु तंत्रज्ञानाकडे बघायचा दृष्टीकोन आणि professionalism/व्यावसायिकता नव्याने प्रबोधिनीबाहेर पडल्यावर शिकायला मिळाली. व्यावसायिक असणे किंवा महत्त्वाकांक्षी असणे हे काही वाईट नाही तर त्याचा ही उपयोग होतो हे नव्याने कळलं. अनेक देशांमध्ये प्रवास केल्यानंतर, तेथील निसर्ग, माणसं, चालीरिती, संस्कृती बघितल्यानंतर परत शेवटी हीच भावना मनात आली की 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा!' जे आपल्याकडे आहे ते आपल्याकडेच आहे! कितीही कष्ट असले तरी समाधानी राहण्याची वृत्ती जी आपल्याकडे आहे ती जगामध्ये खूप कमी ठिकाणी बघायला मिळाली. जरी त्रास झाला तरी आपली माणसे ही आपली आहेत ही भावना केवळ आपल्याकडे बघायला मिळते. एखादे काम शिस्तीने कसे करायचे हे पाश्चात्त्य देशांकडून शिकण्यासारखे आहे.

सुनील दाढे
(१९७१–१९७७)

## नू.म.वि. मधून प्रबोधिनी आणि प्रशालेतील शिक्षक



माझे प्राथमिक शिक्षण नूमविमध्ये झाले. चौथीच्या शिष्यवृत्तीचा वर्ग निमोणकर सर घेत असत. त्या वर्गात जे मित्र मिळाले ते पुन्हा मधल्या काही काळानंतर संपर्कात आले आणि अजूनही आमची जवळीक टिकून आहे.

प्रबोधिनीमध्ये आल्यावर पाचवी ते दहावी हा काळ खूप भारावलेला होता. एक महत्त्वाचा बदल प्रशालेत आल्यावर जाणवला तो म्हणजे शिक्षकांचे, युवक कार्यकर्त्यांचे, मार्गदर्शकांचे मिळणारे प्रेम! अजूनही आठवतंय, की ८वीच्या सुमारास माझे इंग्रजी खूप कच्चे होते आणि शरदराव सुंकर आम्हाला इंग्रजी शिकवत असत. शरदरावांना जेव्हा लक्षात आले, की याचे इंग्रजी थोडे कच्चे आहे तेव्हा त्यांनी सांगितले, आजपासून मी जो सराव तुला करायला सांगणार आहे तो तू करायचा आणि सकाळी शाळेच्या आधी एक तास तू माझ्या घरी यायचे. मग मी रोज त्यांच्या लोकमान्य नगरमधील घरी जात असे. त्यांच्या घरी ते माझा अभ्यास घेत असत आणि मग आम्ही शाळेत जात असू. विनयराव हर्डीकर आमचे वर्गशिक्षक होते. ६वी-७वी मध्ये कधीतरी त्यांनी एक नवीन मोटारसायकल घेतली. ती मोटारसायकल घेतल्यानंतर त्यांनी आमच्या वर्गातल्या प्रत्येकाला मोटारसायकल वरून चक्कर मारून आणली. मागे वळून पाहिले तर हे फार छोटे-छोटे प्रसंग आहेत पण या प्रसंगातून जी आत्मीयता, जे प्रेम निर्माण झाले ते खरोखर काहीतरी वेगळे आहे. प्रशालेत असताना यशवंतराव लेले आणि वामनराव अभ्यंकर हे दोघेही आमचे प्राचार्य होते. मला आठवतंय सातवीच्या शिष्यवृत्तीच्या परीक्षेसाठी तयारी करत होतो. परीक्षा झाली की दोन दिवसांनी आमची प्रशालेची मासिक चाचणी परीक्षा होती. आम्ही वर्गातील काहीजण यशवंतरावांना भेटायला गेलो आणि म्हणालो, ''यशवंतराव, आमची मासिक चाचणी परीक्षेची काही तयारी झालेली नाही. कारण आम्ही सर्व शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करत होतो. त्यामुळे आम्ही ही मासिक चाचणी दिली नाही तर चालेल का?'' यशवंतरावांनी एक क्षणभर आमच्याकडे पाहिले आणि म्हटले, ''आपल्या सगळ्यांचे वर्गात लक्ष असते का?'' ''हो-असते''. आम्ही उत्तरलो. ''त्यामध्ये मग आपले काहीतरी अध्ययन होतच असेल''. ''होय''. ''मग त्या अध्ययनावरती तुम्हाला किती समजले आहे हे आपण या चाचणीमधून तपासूयात!'' आम्ही ती चाचणी दिली आणि सर्वजण उत्तीर्णही झालो! त्यातून हे अनुभवले की ज्या गोष्टी वेळेवर व्हायला पाहिजेत त्या झाल्याच पाहिजेत हा आग्रह आवश्यक आहे. शाळेत झालेले पाठांतर, मनावर कोरली गेलेली पद्ये व प्रत्येकाचा व्यक्तिविशेष फुलवण्याची संधी यात प्रबोधिनीचे वेगळेपण सामावलेले होते.

## युवक विभाग – अविस्मरणीय गणेशोत्सव आणि गटकार्ये

युवक विभागाच्या दोन आठवणी निश्चितपणे सांगता येतील, त्या म्हणजे गणेशोत्सव आणि पालखी. या दोन्ही मिरवणुका कधीच विसरता येणार नाहीत. मला आठवतं गणेशोत्सवामध्ये मी पुढे ध्वज नाचवत असे. एका गणपती बरोबर जाऊन आलो आता दुसऱ्या गणपती बरोबर जाऊयात, बाकीच्या दलांचे बरची नृत्य कसे सुरू आहे ते बघूयात, असे म्हणत रात्र संपून जायची. प्रत्येक गटाबरोबर ढोल-बरच्यात सहभागी व्हायचे. मग हाताला घट्टे पडलेले असायचे त्या जखमा बऱ्या व्हायला पुढे चार-पाच दिवस लागायचे. साहस सहलीमध्ये आम्ही एकदा राजगडला गेलो होतो. गुंजवणी नदी वेगात वाहत असताना ओलांडणे हा अनुभव कायम लक्षात राहील असाच होता. आम्हाला युवक विभागात त्यावेळी जी व्यक्तिकार्य आणि गटकार्य दिली जायची ती ही आठवतात. भाई फडके आणि मोहनराव गुजराथी हे दोघे त्यावेळेला युवक विभागात आमच्यासाठी खूप जवळून लक्ष देऊन सर्व नियोजन करत असत आणि आमच्याकडून ते पूर्ण करवून घेत. अजितराव कानिटकरांशी पण आमची चांगली ओळख होती. या सर्वांकडून आम्हाला खूप काही शिकायला मिळाले. एकदा भाई फडकेंनी मला सांगितले की आज रात्री तू एक व्यक्तिगत कार्य करायचे. जंगली महाराज रस्ता आणि प्रभात रस्ता याच्यामधले जे सर्व रस्ते आहेत तिथे प्रत्यक्ष जायचे आणि त्या सगळ्या भागाचा छान नकाशा तयार करून आणायचा. मला तोपर्यंत हा भागच माहीत नव्हता. हे व्यक्तिकार्य करत असताना काही गुरख्यांनी हटकले, काही ठिकाणी कुत्री अंगावर धावून आली. रात्री ११ ते १ची वेळ असल्याने रस्त्यांवर माणसे देखील नव्हती. त्या अनुभवातून धीटपणा, बेडरपणा शिकायला मिळाला. शिवापूरला झालेली हिवाळी शिबिरे, तिथे केलेले श्रमदान आणि या सर्वातून झालेले शिक्षण हे खूप आनंददायक, उपयुक्त आणि चिरकाल स्मरणात राहील असे आहे.

दहावीच्या शेवटी प्रज्ञा मानस विभागाने सगळ्यांची ॲप्टिट्यूड टेस्ट घेतली. त्यामध्ये मला असे सांगण्यात आले, की जिथे खूप खोलातल्या गणिताची गरज आहे अशी विद्याशाखा मला फारशी सोयीची नसेल. मी वाणिज्य शाखेची निवड केली. त्यावेळी आप्पा पेंडसे प्रबोधिनीचे संचालक होते. प्रबोधिनीच्या दारात एकदा आप्पा १०-१५ मिनिटे उभे राहून मला विचारत होते की आपण पुढे काय करणार? त्यावेळी काय-काय करता येईल असे माझे विचार मी सांगितले तेव्हा ते म्हणाले, फक्त इंजिनीअर किंवा डॉक्टर होऊनच देशसेवा होऊ शकते का? इतर कितीतरी मार्ग आहेत ज्यातून आपण देशसेवेसाठी काहीतरी चांगले करू शकू तर आपण वेगळे काहीतरी का नाही करायचे? त्यांच्या प्रश्नांचा माझ्या निर्णयावर काही परिणाम निश्चित झाला. ११वी-१२वी ते M.Com पर्यंत माझे शिक्षण मॉडर्न कॉलेजमध्ये झाले. या सगळ्या काळात माझे पहिली ते चौथी बरोबर असणारे मित्र योगायोगाने परत भेटले. पाचवी ते दहावी या सहा वर्षांत माझा प्रबोधिनीमध्ये जो कालावधी गेला त्यामध्ये खरेतर माझा या मित्रांशी काहीच संपर्क नव्हता. त्यामुळे ११वी नंतर प्रबोधिनीचे मित्र आणि हे मित्र असा माझा मित्र परिवार एकदम वाढला. मॉडर्न कॉलेजमध्ये असताना पहिल्या वर्षात मॉडर्न कॉलेजचा मी 'Best Student' होतो. M.Com ला मी विद्यापीठात पाचवा क्रमांक मिळवला. १२वी मध्ये असताना राष्ट्रीय प्रज्ञा शिष्यवृत्ती मिळाली. हे सर्व सुरू असताना एकीकडे कुठेतरी प्रबोधिनीमध्ये शिकलेली प्रकल्पांमधून शिकण्याची जी पद्धत होती ती देखील कॉलेजमध्ये सुरू झाली होती. कॉलेजमध्ये असताना वादविवाद स्पर्धांमध्ये भाग घेत असे. त्यातही अनेक बक्षिसे मिळाली. Forum of Free Enterprise ची त्यावेळेला आर्थिक विषयांवरची छोटी प्रकाशने असायची ती वाचण्याचा छंद या काळात निर्माण झाला होता. ट्रेकिंगचीही आवड निर्माण झाली.


**'रूप पालटू' व्याख्यानमाला - २०१८**

**मॉडर्न महाविद्यालय - विद्यार्थी ते प्राध्यापक - एक प्रवास**

माझे जग विस्तारत जाण्याचा हा काळ होता. आम्ही प्रशालेत असेपर्यंत युवती प्रशाला ही फार मोठी झालेली नव्हती. फार मैत्रिणी नव्हत्या. कॉलेजमध्ये विस्तारणाऱ्या जगात मैत्रिणी पहिल्यांदा मिळाल्या. त्याकाळात जे मित्र मिळाले त्यातील काहीजणांशी आजही मैत्री टिकून आहे. त्यांचे आणि माझे कुटुंब यांची देखील जवळीक आहे खूप घरोबा झालेला आहे. आजही त्यांना भेटल्याशिवाय पुण्यातून निघणे होत नाही. कॉलेजमध्ये गेलो तेव्हा UPSC च्या परीक्षेबद्दल कळले. त्यासाठी तयारी केली पाहिजे असे जाणवले. अभ्यासाला एक प्रकारचे वेगळे पैलू पडले. प्रबोधिनीमध्ये शिकलेली सामाजिक जाणीव अधिक विकसित होत गेली. कॉलेजमध्ये असताना आंध्रप्रदेशमध्ये जेव्हा मोठे वादळ झाले तेव्हा त्या वादळाच्या नंतर मदतकार्य करायला स्वयंसेवक म्हणून जाणे झाले. त्या पंधरा दिवसांमध्ये गरीब लोकांना नैसर्गिक आपदांमुळे काय भोगायला लागते याचा अनुभव आला. विशेषत: अजितराव कानिटकर, गिरीशराव बापट तेव्हा आमच्या बरोबर होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि इतर सहकार्यांसोबत सगळे काम करताना या सामाजिक जाणिवा अधिक खोलवर रुजल्या असे मागे वळून पाहताना म्हणावे लागेल.

M. Com. झाल्यावर एकीकडे UPSC परीक्षेचा अभ्यास करत असताना मॉडर्न कॉलेजमध्ये चार वर्षे मी अध्यापन केले. तोही एक वेगळा अनुभव होता. त्यावेळी मी Business communications, company law, secretarial practice असे विषय शिकवत असे. प्रबोधिनीत शिकलेल्या संकल्पना वापरून मी विविध प्रयोग करीत असे. उदाहरणार्थ आपल्या शिकवण्याचा विद्यार्थ्यांवर किती परिणाम होतोय? त्यातले त्यांच्यापर्यंत किती पोचते आहे हे मोजण्यासाठी म्हणून काही प्रयोग अध्यापक म्हणून मी काही वेळेला केले. त्यामध्ये एक छोटी प्रश्नावली बनवली होती. त्या प्रश्नावलीच्या उत्तरांमधून Randomly निवडलेल्या विद्यार्थ्यांना विचारलं होतं, की माझे शिकवणे तुम्हाला कसे वाटले? त्या काळामध्ये महाविद्यालयात असे काहीतरी प्रयोग करणे हे थोडेसे धाडसचे होते. मात्र प्रबोधिनीमध्ये जे वेगळ्या प्रकारचे वातावरण अनुभवलेले होते त्यामधून एक आत्मविश्वास मिळालेला होता, की आपण जर मनापासून शिकवत असू किंवा मनापासून कुठलीही गोष्ट करत असू तर त्याचा काय परिणाम होत आहे हे सुद्धा बघूयात! समजा आपले शिकवणे विद्यार्थ्यांपर्यंत पोचत नसेल तर त्यामध्ये काय सुधारणा करता येईल हे बघूयात. कॉलेजच्या अनेक उपक्रमांत माझा प्राध्यापक म्हणून चांगला सहभाग असे. चर्चासत्र किंवा परिसंवाद आयोजित करणे असो, अभ्यासात थोडेसे मागे पडणाऱ्या मुलांना व्यक्तिश: मदत करणे असो किंवा एखादा विद्यार्थी आजारी पडला तर घरी जाऊन त्याची चौकशी करणे असो अशा सगळ्यातून जी चार वर्षे मी मॉडर्नमध्ये शिकवत होतो त्या वेळेसचे विद्यार्थी हे माझे जवळचे मित्र झाले. किंबहुना त्यापैकी काही जणांनी माझ्यासारखीच UPSC ची परीक्षा

द्यायचेही ठरवले. त्यापैकी एक म्हणजे सदानंद दाते. हे नंतर प्रबोधिनीच्याही परिचयाचे झाले. माझ्या नंतर एक-दोन वर्षांनी सदानंद दाते IPS मध्ये निवडले गेले. ते शासकीय सेवेत करत असलेल्या कामाचा मला अत्यंत अभिमान आहे. प्रबोधिनीतील मित्रांपैकी वामन पारखी हे एक जवळचे मित्र. त्यांनीही नंतर UPSC ची परीक्षा दिली आणि काही वर्षे शासकीय सेवा केली. अशाप्रकारे वाढते मित्र, वाढता संपर्क आणि सोबतच अभ्यासाची वेगळी दिशा कॉलेजमध्ये असताना मला अनुभवायला मिळाली. डॉ. पु. स. पाळंदे, निवृत्त आयुक्त (पुणे महानगरपालिका) हे स्वत: IAS होते. त्या वेळेस UPSC ची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना काहीही शुल्क न घेता ते मार्गदर्शन करायचे. आम्ही अनेकजण त्यांच्याकडे मार्गदर्शनासाठी जात असू. त्यांचाही आमच्या अनेकांच्या कुटुंबांबरोबर स्नेह होता.



**डॉ. पु. स. पाळंदे व सौ. पाळंदे, सत्यम दाढे, सौ. सुषमा दाढे, ईशा व आरती पारखी व वंदना पारखी यांच्यासमवेत - १९९९**

### UPSC ची तयारी, त्यातील यश आणि आयुष्यभराचे उपासनाव्रत

दहावी नंतर आप्पांशी बोलताना जेव्हा आप्पा म्हणाले होते की आपण काहीतरी वेगळे केले पाहिजे तेव्हा UPSC चा विचार पहिल्यांदा मनात आला. त्यानंतर हळूहळू हा विचार दृढ होत गेला. १९८६ साली अविनाश धर्माधिकारी IAS झाले. त्यापूर्वी १९८४ आणि १९८५ या दोन वर्षी मी UPSC ची Prelim परीक्षा दिली होती. त्यामध्ये मी यशस्वी होऊ शकलो नाही. त्यावेळेला मी, अविनाश धर्माधिकारी, प्रदीप कुलकर्णी, मकरंद आडकर, प्रमोद सडोलीकर असे आम्ही सर्व एकत्र अभ्यास करायचो. एकत्र अभ्यास करताना मनात हे पक्के होत गेले की आपल्याला UPSC चा अभ्यास जमेल आणि आपण यशस्वी होऊ शकतो. एकदा UPSC ची परीक्षा द्यायची हे मनाशी पक्के झाल्यावर आणि १९८६ साली अविनाश धर्माधिकारींची शासकीय सेवेत निवड झाल्यानंतर हा निश्चय आणखीनच दृढ झाला. १९८७ सालच्या परीक्षेत यशस्वी व्हायचेच ठरवले. त्याप्रमाणे सर्व नियोजन केले. त्यावेळी मी स्वत:चा दिनक्रम पाहिला. आपल्याला अभ्यासाला जास्त वेळ कसा मिळवता येईल असा विचार सुरू झाला. सुरुवातीला एक प्रयोग म्हणून शाळेत असताना आपण उपासना शिकलेलो आहोत तर प्रबोधिनीमध्येच येऊ आणि सकाळी उपासना मंदिरात उपासना करून अभ्यासिकेत अभ्यास करूयात असे ठरविले. मला असे लक्षात आले की उपासनेनंतर जो अभ्यास करतो आहे तो खूप चांगला होतो. त्यामुळे उपासनेची इतकी सवय झाली की आजही, १९८७ पासून २०२१ पर्यंत मी उपासनेच्या आधी अन्नाचा एकही कण घेत नाही. १९८८ साली मी Indian Audit and Accounts Service (IAAS) या सेवेमध्ये कामास सुरुवात केली. आमच्या विभागाचे अनेकांना परिचित असलेले प्रमुख म्हणजे Comptroller and Auditor General (CAG) of India.

### ३२ वर्षांचा प्रवास - समाधान देणारे अनेक प्रसंग

प्रशासनामध्ये विधिमंडळ, प्रत्यक्ष प्रशासन आणि न्यायव्यवस्था असे मुख्य भाग असतात. प्रशासनाचे विधिमंडळाप्रती उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक (सीएजी) असतात. सीएजींसाठी काम करणारा जो विभाग आहे त्याचे नाव India Audit and Accounts Department. या डिपार्टमेंटच्या महत्त्वाच्या पदांवर मी मुख्यत: काम केले. Accountant General Audit, Maharashtra; Principal Accountant General Audit, Odisha; Director General of Audit - Central Expenditure, Delhi अशा पदांवर मी काम केले. या पदांवर काम करताना प्रशासकीय प्रक्रिया सुधारण्यात योगदान देण्याची संधी मला अनेकदा मिळाली. Accelerated Irrigation Benefit Program नावाच्या एक देशभर चालणाऱ्या केंद्र सरकारच्या योजनेतील ओडिशामधील जलप्रकल्पांचे मूल्यमापन माझ्या नेतृत्वाखाली झाले. त्यामध्ये केवळ खर्चाकडे न बघता त्या योजनांमधून प्रत्यक्ष अपेक्षित जो फायदा होता तो फायदा झाला की नाही? उदा. योजना करताना म्हटलं, की या प्रकल्पाने या भागातील उत्पन्न इतक्या रुपयांनी वाढेल, इतक्या लोकांचे जीवनमान सुधारेल ते प्रत्यक्षात सुधारले का नाही? हे बघण्याचा सुमारे ४०-५० वर्षांतील पहिला महत्त्वाचा प्रयत्न केला गेला. त्यानंतर त्यातील निष्कर्ष आमच्या अहवालात आले. त्या निष्कर्षांमधून असे लक्षात आले, की गुंतवणूक आणि त्यातून होणारा लाभ, विशेषत: जनसामान्यांचे जीवनमान सुधारणे आणि उत्पन्न वाढणे हे लाभ अपेक्षेनुसार नाहीत. हे जेव्हा आम्ही सिद्ध करू शकलो तेव्हा ओडिशा सरकारने या सगळ्या गणिताकडे पुनश्च बघण्याचे मान्य केले. अशाप्रकारचे आरोग्य, विकास, सामाजिक क्षेत्रातील मूल्यमापनाचे काम मला करायला मिळाले.

गेल्या ३२ वर्षांच्या या सर्व प्रवासाबद्दल सांगायचे म्हटले तर हा सुदीर्घ प्रवास आहे. या ३२ वर्षांत भारतामधील

तमिळनाडू, गुजरात, ओडिशा, दिल्ली या राज्यांत काम केले. दिल्लीमध्ये माझे कामानिमित्त दहा वर्षे वास्तव्य होते. महाराष्ट्रामध्ये पुणे-नागपूर मिळून सहा वर्षे आणि पाच वर्षे ओमान सरकारच्या अर्थ मंत्रालयामध्ये भारत सरकारच्या वतीने सल्लागार म्हणून, असे विविध ठिकाणी काम करण्याची संधी मिळाली. कामानिमित्त जवळ-जवळ पाच खंडात पंधरा-सोळा देशांमध्ये प्रवास झाला. या सगळ्या प्रवासाच्या जोडीला सामन्यातील सामान्य व्यक्ती ते मोठ्यातल्या मोठ्या व्यक्तींचा काही निमित्ताने परिचय होत गेला.

**आत्मीयता, माणूसकी आणि त्यातून मिळालेले समाधान**

अनेक प्रसंग मला आठवतात जे अत्यंत समाधानाचे आहेत, त्यापैकी दोनच सांगतो. पहिला प्रसंग मी जेव्हा चेन्नईला होतो, त्यावेळी एक बाई मला भेटायला आल्या होत्या. **भेटायला आलेल्या त्या बाई म्हणाल्या, ''मी खूप त्रास घेऊन तुम्हाला भेटायला आली आहे. एकच विनंती आहे, माझ्या नवऱ्याचे जे पेन्शनचे काम आहे ते जर कृपा करून लवकर केले तर बरे होईल. त्यांना पेन्शन मिळत नाही म्हणून खूप मोठा मानसिक तणाव आलेला आहे. त्याचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर झालेला आहे. त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करून मी इथे आलेली आहे''. त्या वेळेस लक्षात आले, की छोटा प्रशासकीय निर्णय परंतु त्याचा एखाद्या व्यक्तीवर असा परिणाम होऊ शकतो. जर काही त्या माणसाचे बरे-वाईट झाले तर मी स्वत:ला क्षमा नाही करू शकणार. ही दिरंगाई दूर होण्यासाठी काही सरकारी कायदेशीर तरतुदींच्या पूर्ततेती आवश्यकता होती, त्याची सर्व पूर्तता करून २४ तासाच्या आत ते प्रकरण मी तडीस नेले. त्यांचे निवृत्ती वेतन सुरू झाले. पंधरा दिवसानंतर त्या बाई परत भेटायला आल्या. येताना तिरूपतीचा प्रसाद घेऊन आल्या आणि म्हणाल्या, ''तुम्ही माझ्या नवऱ्याचा जीव वाचवला!'' मी काही जीव वगैरे वाचवला नाही, मी फक्त माझे काम केले. या प्रसंगातून धडा घेऊन मी चार महिन्यांत विलंब होणारी पेन्शनची बहुतेक सर्वच प्रकरणे अद्ययावत करण्यासाठी कार्यप्रणालीत सुधारणा केल्या.**

दुसरा प्रसंग २००७-०८ सालचा आहे. महाराष्ट्रामध्ये आणि विशेषत: विदर्भात अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या. त्यामागे विविध कारणे होती. आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने ज्या मदतीच्या उपाययोजना केल्या होत्या त्याची परिणामकारकता, मदतीच्या प्रत्यक्ष उपयोगाच्या तपासणीचे काम हे महाराष्ट्राचा अकाऊंटंट जनरल म्हणून मी हाती घेतले. ते तपासताना आम्ही अनेक प्रयोग केले आणि अनेक परिमाणे वापरली. त्यापैकी एक परिमाण म्हणजे ज्या घरात आत्महत्या घडली त्या कुटुंबांचे सर्वेक्षण केले. त्या सर्वेक्षणाचे काम आपल्या प्रबोधिनीच्या प्रमोदराव सडोलीकर यांनी केले. हे काम त्यांनी व्यावसायिक पद्धतीने व निविदा पद्धतीने निवड होऊन मिळवले होते. हे सर्वेक्षण झाल्यानंतर आमच्या ऑडिटचा अहवाल तयार झाला. शासनाच्या सुमारे सात सचिवांच्या सहभागाने सुमारे एकोणीस तास चर्चा झाली. या सर्व उपाययोजना कशाप्रकारे प्रत्यक्षात अंमलात येत आहेत, त्यामध्ये आणखी काय करायला पाहिजे, कुठे चुकते आहे, यावर खूप दीर्घ चर्चा होऊन शेवटी त्यामध्ये कुठे सुधारणा झाली पाहिजे, काय बदल झाले पाहिजे हे ठरले. **आमचा हा अहवाल जेव्हा महाराष्ट्र विधीमंडळात मांडला गेला त्यानंतर पी. साईनाथ नावाच्या नामवंत विचारवंतांनी 'द हिंदू' वृत्तपत्राच्या संपादकीयच्या शेजारी एक स्तंभलेख लिहिला. त्या लेखात त्यांनी लिहिले की सी.ए.जींचे अहवाल अनेक असतात पण हा अहवाल वेगळा आहे. हा अशासाठी वेगळा आहे, की माणुसकीशी संबंधित असलेल्या या महत्त्वाच्या प्रश्नाचा या अहवालात अत्यंत वस्तुनिष्ठ आणि अत्यंत समर्पक विचार झालेला आहे. केवळ विचार झालेला नसून या प्रश्नांची काय उत्तरे असू शकतील त्याच्याबद्दल कुठेतरी व्यवहार्य चिंतन यामध्ये दिसून येत आहे. ही त्यांनी लेखामध्ये नमूद केलेली वाक्य माझ्या दृष्टीने अतिशय समाधानाची आहेत.** अशाप्रकारचे समाधानाचे अनेक क्षण हे शासकीय सेवेने मला मिळवून दिले.

माझ्या बाबतीत बोलायचे तर मला मागे वळून पाहताना समाधान या गोष्टीचे आहे की काहीतरी महत्त्वाचे, अतिशय संवेदनशीलपणे माझ्या नेतृत्वाखाली हाताळले गेले. त्यातून ज्या उपाययोजनांचा विचार झाला त्या उपाययोजना या दूरगामी परिणाम करणाऱ्या ठरल्या. या व्यतिरिक्त माझ्यामुळे किंवा माझ्या नेतृत्वाखाली झालेल्या कामामुळे बॉम्बे स्टॅम्प ॲक्टमध्ये अमेंडमेंट झाली. रजिस्ट्रेशन ॲक्ट मधले एक कलम कायद्याच्या पुस्तकातून बाहेर गेले. अशी अनेक अनेक उदाहरणे मी देऊ शकेन. परंतु जे कायम लक्षात राहील अशा गोष्टींपैकी या सुधारणा करणाऱ्या ज्या दोन गोष्टी होत्या त्या फार समाधानाच्या होत्या. आणखी एक ओझरता उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे २०१९ साली India's preparedness for sustainable development goals या नावाचा एक सविस्तर अभ्यास माझ्या सहीने आणि माझ्या नेतृत्वाखाली तयार झाला. तो अहवाल एक वेगळ्या प्रकारचा अहवाल होता. त्यातूनही कुठेतरी भविष्यात आपल्याला काय केले पाहिजे याबद्दलचा विचार होता. आज दोन वर्षांनी मागे वळून पाहताना त्यातील अनेक सूचनांवर कार्यवाही झालेली दिसत आहे.






अपयशाबद्दल बोलायचे तर सगळे जे व्हायला हवे होते, झाले असते तर चांगले झाले असते असे काही हातून घडले आहे असे नाही. पण खूप मोठे काहीतरी चुकले आहे असे मागे वळून पाहताना वाटत नाही. काही चुका झाल्या असतील त्या सुधारल्या गेल्या परंतु मला आयुष्यभराची खंत आहे असा एकही प्रसंग आठवत नाही.

## प्रशासनात अधिकारी म्हणून नेतृत्व

प्रबोधिनीपेक्षा माझी नेतृत्वाची संकल्पना फार वेगळी नाही. नेतृत्वामध्ये दोन-तीन गोष्टी नक्की असल्या पाहिजेत, त्यापैकी एक म्हणजे नेतृत्वाला कुठेतरी नैतिकतेचा आधार पाहिजे. जे आपण करत नाही ते इतरांनी आपल्या शब्दासाठी करावे ही अपेक्षा बाळगणे चुकीचे आहे. दुसरे म्हणजे, जो नेता आहे त्याला लांबचे बघता आले पाहिजे. पाच, दहा वर्षे असो किंवा ५० वर्षांनंतरचे असो, लांबचे बघून नेत्याला त्यादृष्टीने काहीतरी विचार करता आला पाहिजे. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नेत्याने आपली जबाबदारी कधीही झटकता कामा नये. प्रशासनामध्ये विशेषत: काही जणांमध्ये असे दिसते की जर काही चांगले झाले तर ते मी केले पण जर काही चुकले तर माझी साधनसंपत्ती अपुरी होती किंवा माझ्या अनुयायांची अशी स्थिती होती किंवा परिस्थितीच अशी होती की मी काही करू शकलो नाही अशा सबबी पुढे केल्या जातात. मला हे अत्यंत चुकीचे वाटते. जर काही चांगले काम झाले तर त्याचे श्रेय जितके नेत्याने घ्यावे तितकेच जर ठरवल्याप्रमाणे गोष्टी झाल्या नाहीत तर त्याची जबाबदारीसुद्धा नेत्याने स्वीकारली पाहिजे.

ज्यावेळी तुमच्याहून कोणीतरी वरिष्ठ असतो त्यावेळेला तुम्हाला त्याच्या विचाराच्या पद्धतीशी किंवा त्याच्या नेतृत्व शैलीशी जुळवून घ्यावे लागते. प्रशासनामध्ये विशेषत: तुम्हाला जो तुमचा वरिष्ठ अधिकारी आहे त्याचा विश्वास संपादन करणे आणि त्याचा पाठिंबा मिळवणे हे आवश्यक असते. ज्यावेळी तुम्ही उच्च पदांवर जाता त्यावेळेला तुमच्या विचारांना प्राधान्य नक्की असते मात्र कुठेतरी आपण कायद्याच्या चौकटीत काम करत असतो आणि त्या चौकटीमुळे येणारी जी बंधने असतात त्या बंधनांचे भान ठेवावे लागते. तुम्हाला जरी वाटले, की एखादा कायदा चुकीचा आहे आणि मला तो बदलून टाकायचा आहे पण तरी तो बदलता येत नाही. अशावेळेला आपल्याला जी गोष्ट योग्य वाटेल ती गोष्ट करण्यासाठी आपल्याला ज्या लोकांचे सहकार्य अपेक्षित आहे त्या सगळ्यांचे सहकार्य मिळवण्यासाठी गटात/विभागात/सहकाऱ्यांमध्ये, योग्य ती मनोभूमिका तयार करावी लागते. माझ्या स्वत:च्या अनुभवावरून तुम्ही तुमची नैतिकता सोडा, नियम बाजूला ठेवा असे सरळ कुणीही तुम्हाला सांगत नाही. काही वेळेला विशिष्ट परिस्थितीमध्ये विशिष्ट गोष्टी करा अशा सूचना आडून-आडून मिळतात. त्या सूचना मिळाल्यानंतर काय निर्णय घ्यायचा हा तुमचा प्रश्न असतो. दोन्ही गोष्टी करता येतात. कुठेतरी 'मी करणार नाही' असे अभिनिवेशाने सांगता येते, कुठेतरी करायचे नाही पण तोंडाने बोलायचे नाही, 'करत नाही असे ' असे थोडेसे युक्तीने पण वागता येते. जे प्रशासनात यशस्वी होतात ते मुख्यत: दुसऱ्या पद्धतीने नाही म्हणणारे असतात. तिथे तुमची युक्ती ही जास्त महत्त्वाची असते. प्रशासनात असे अनेक मार्ग असतात की ज्या मार्गाने एखादी गोष्ट टाळता देखील येते. अनेक मार्ग असतात ज्याद्वारे योग्य गोष्ट करताही येते. काय करायचे हे आपण ठरवायचे असते. आपली नीतीमूल्य किती दृढपणे आपण अमलात आणणार हे शेवटी आपल्यावर अवलंबून असते. जास्तीत जास्त काय होईल? जेव्हा अशी वेळ असेल, की एखादी गोष्ट आपल्याला नाईलाजास्तव करायची आहे आणि ती करायची आपली तयारी नाही त्यावेळेला फारतर थोडीशी व्यक्तिगत किंमत मोजायला लागेल. ही व्यक्तिगत किंमत प्रशासनात मुख्यत: बदलीच्या स्वरूपात असते. कितीही बदल्या व्हायची आपली मानसिक तयारी

असेल तर व्यक्तिगत पातळीवर आपल्या मूल्यांशी तडजोड न करता प्रशासनात चांगले काम करता येते असा माझा स्वत:चा अनुभव आहे.

**रूप पालटू देशाचे – प्रशासकीय सेवेच्या माध्यमातून**

'रूप पालटू देशाचे' किंवा 'अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो' हे प्रबोधिनीतील ध्येयविचार आहेत ते खूप गहन अर्थ असलेले आणि त्याचबरोबर अत्यंत प्रेरक अशा प्रकारचे शब्द आहेत. माझ्यापुरते बोलायचे, तर सुमारे ३२ वर्षांच्या शासकीय सेवेमध्ये हा माझा महत्त्वाचा निकष होता, की कुठलाही निर्णय घेताना याचा परिणाम हा आपल्या देशावर, आपल्या भावी पिढीवर काय होईल हे बघायचे आणि मग या निकषानुसार त्या निर्णयाचा विचार करायचा.




एक उदाहरण द्यायचे तर २०१५ ते २०१९मध्ये International centre for environment audit and sustainable development या जगभरातील environment auditors ना प्रशिक्षण देणाऱ्या एकमेव संस्थेचा मी प्रमुख होतो. जयपूरजवळ आमच्या संस्थेचा मोठा सुसज्ज परिसर आहे. पहिल्या काही महिन्यात या संस्थेचे काम करत असताना मला लक्षात आले, की लोकांना नुसते वर्गात बसून प्रशिक्षण देणे हे पुरेसे नाही तर असे काहीतरी केले पाहिजे की जे बघून प्रशिक्षणार्थींना वाटेल की हे जर इथे होऊ शकते तर आपणही काही करू शकतो. मग त्यासाठी आम्ही पूर्ण संस्थेचे प्रांगण ईको-फ्रेंडली केलेच पण एक पाऊल पुढे जाऊन राजस्थानातील नामशेष होऊ लागलेल्या वनस्पतींच्या प्रजातींपैकी सहा-सात प्रजाती आम्ही उद्यानामध्ये लावल्या. त्यामुळे तिथे येणाऱ्या सगळ्या प्रशिक्षणार्थींना ते छोटेसे उद्यान हे एक प्रकारचे प्रेरणास्थान बनून गेले.

माझ्या सुमारे दहा-बारा वर्षांच्या सेवेच्या कालखंडमध्ये असे अनेक प्रसंग आले, की जेव्हा आपल्या हातून जे काम सुरू आहे त्या कामाचे मूल्यमापन हे आपल्यापेक्षा इतर कुणीतरी करावे हे सतत वाटत गेले. आपले मूल्यमापन चांगले करू शकतील असे कोण आहेत? तर जे लोकांचे प्रतिनिधी विधीमंडळात काम करतात तिथे तुमच्या कामाचा कस लागतो. माझ्या दृष्टीने समाधानाची बाब ही आहे की महाराष्ट्र आणि ओडिशा, एक प्रगत आणि एक थोडे कमी प्रगत असलेले राज्य, या दोन्ही राज्यांच्या लोकलेखा समितीला मदत करण्याची संधी मला मिळाली. दोन्ही समित्यांमध्ये ज्या वेळेला मी त्या-त्या राज्याच्या महालेखाकार पदांवरून दुसरीकडे कुठेतरी जाणार होतो त्यावेळी दोन्ही राज्यातील या समित्यांनी माझे आभार मानले. महाराष्ट्रातील समितीने प्रकट अभिनंदन केले. ओडिशातील अशा एका समितीच्या अध्यक्षांनी मला अभिनंदन आणि आभार पत्र लिहून 'तुमच्यामुळे आम्ही चांगले काहीतरी करू शकलो' असे त्यामध्ये म्हटले. अशाप्रकारची कामाची पावती मिळणे हे समाधानाचे असते. त्याचवेळी याच्यापलीकडे जाऊन आपल्याला स्वत:ला समाधान किती मिळते हे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे राहिलेले आहे. अजून एक-दीड वर्षांनंतर मी शासकीय सेवेतून निवृत्त होईन. ज्या क्षेत्रातून मी प्रशासनात आलो ते शिक्षणक्षेत्र अजूनही माझ्या आवडीचे क्षेत्र आहे तेथे काहीतरी काम करायचे आहे. सुदैवाने माझ्या कारकिर्दीच्या अगदी शेवटाला ज्या सेवेमध्ये मी ३२ वर्षे काम केले त्या सेवेत येणाऱ्या अधिकाऱ्यांना घडवण्याचे काम करण्याची संधी मला मिळालेली आहे. ज्यांना माझ्यासारखे विचार करणे आवडते, ज्यांना 'रूप पालटू देशाचे' यामध्ये काहीतरी प्रेरणा मिळते असे अधिकाधिक अधिकारी घडवण्यात जर माझा थोडासा हातभार लागला तर त्यामध्ये मला समाधान आहे. मला वाटते प्रत्येक व्यक्तीने मी अमुक केले म्हणण्यापेक्षा 'असू आम्ही सुखाने पत्थर पायातील, मंदिर उभवणे हेचि अमुचे शील' असे आपण पद्यात म्हणतो त्याप्रमाणे शील जपण्याची संधी मिळेल असे काहीतरी करत रहावे असे वाटते.

प्रत्येक राज्यातून, भारताच्या कानाकोपऱ्यातून येणारे UPSC उत्तीर्ण होऊन शासकीय सेवेत आलेले अधिकारी हे सगळे कधीच सारखे नसतात. प्रत्येकाची मानसिकता, जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन, जीवनाकडूनच्या अपेक्षा ही वेगळ्या असतात. अधिकारी म्हणून UPSC मार्फत निवड झाल्यानंतर प्रत्येकाची स्वत:च्या अधिकाराची जाणीव ही वेगळी असते. काहीजण केवळ सेवा करायला आलेले असतात, काहीजण अधिकार गाजवायला आलेले असतात, काहीजण प्रोफेशनल ऑडीटर बनायचे म्हणून आलेले असतात. तरीही या सगळ्यात एक गोष्ट समान असते ती म्हणजे प्रत्येकाची बुद्धिमत्ता! UPSC मधून निवडलेला अधिकारी हा अतिशय बुद्धिमान असतो, ही गोष्ट कायम लक्षात ठेऊन जर त्या अधिकाऱ्याला आपण एक योग्य दृष्टिकोन त्याच्या पुढच्या कारकिर्दीसाठी देऊ शकलो तर ज्या चष्म्यातून त्याच्यापुढे येणाऱ्या आव्हानांना तो सामोरा जाईल, ज्या मूल्यांच्या एक प्रकारच्या 'चष्म्यातून' त्याच्यापुढे असणाऱ्या समस्या तो बघेल, विविध रंग उलगडेल, तो दृष्टीकोन आपण किती चांगला देऊ शकू, हे माझ्या मते प्रशासनाच्या कार्यक्षमतेसाठी आणि परिणामकारकते साठी महत्त्वपूर्ण ठरेल.

### आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधित्व




आत्तापर्यंत जवळपास पंधरा विविध आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मी भारताचे प्रतिनिधित्व केलेले आहे. २०१७साली UN INTOSAI (International Organization of Supreme Audit Institutions) चा एक परिसंवाद होता. त्यामध्ये जगभरातील चिरंतन विकासाच्या ध्येयांबद्दल जे काम चालू आहे त्याचे मूल्यमापन कसे करावे यावर विचार झाला. त्या विचारासाठी जो मूळ आराखडा होता तो बनवण्याची संधी मला मिळाली आणि त्याबद्दल जी चर्चा झाली त्याचे काही प्रमाणात सूत्रसंचालन करण्याची देखील संधी मला मिळाली. INTOSAI WGEA म्हणून ५० देशांचा गट आहे ज्याची Global training Facility भारतात आहे. त्या training Facility चा मुख्य म्हणून मी भारताचे प्रतिनिधित्व करत असे. ते प्रतिनिधित्व करत असताना तीन-साडेतीन वर्षे किमान सहा-सात वेळेला जागतिक स्तरावर Environment audit किंवा Sustainable Development च्या ऑडिटसाठी काय केले पाहिजे या विचारविमर्शामध्ये माझा सक्रिय सहभाग होता. भारताचा प्रतिनिधी म्हणून जेव्हा मी तिथे विचार मांडत असे त्यावेळेला तिथल्या सर्व देशांच्या प्रतिनिधींना ते महत्त्वाचे वाटत असत. अनेक प्रसंगी गटाचे जे अध्यक्ष होते ते महत्त्वाच्या निर्णयांपूर्वी माझ्याशी सल्लामसलत करत असत. असे होण्याचे एकमेव कारण म्हणजे भारतातील, जयपूरमधील आमच्या जागतिक प्रशिक्षण केंद्रामार्फत global training चे आपण केलेले काम होते. भारताबद्दल त्या व्यासपीठावर जो आदर निर्माण झाला तो मला अतिशय समाधान देणारा व अभिमानास्पद होता.



माझ्यामते सगळ्यात महत्त्वाची मी प्रबोधिनीमध्ये शिकलेली गोष्ट म्हणजे, आपल्या इथे वापरली जाणारी सहविचारात्मक नेतृत्व पद्धती. कुठलाही निर्णय घेण्यापूर्वी सगळ्यांचे विचार आपण ऐकून घेतो, त्यावर चर्चा करतो. पण एकदा निर्णय घेतला की सहविचार थांबून सहकृतीकडे लक्ष आपण केन्द्रित करतो. माझ्या प्रशासकीय कारकिर्दीत मी ही नेतृत्व पद्धती खूप यशस्वीपणे वापरू शकलो. त्याचा मला खूप फायदा झाला. सगळ्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतल्याने त्या निर्णयाला प्रत्येकजण एक प्रकारे जोडला जायचा आणि जरी निर्णय एखाद्याच्या मनाविरुद्ध घेतला गेला तरीही ती व्यक्ती निर्णय प्रक्रियेत सहभागी असल्यामुळे त्या निर्णयाच्या कार्यवाहीत बांधील असायची.







### जिवलग मित्रसंपदा - केल्याने देशाटन

प्रबोधिनीत असल्याचा फायदा झाला म्हणजे इथे अनेक मित्र मिळाले. त्या मित्रांशी संपर्कात राहणे हे अत्यंत उपयुक्त ठरले. अजय फाटक, मिलिंद साठे, अरविंद करंदीकर ही नावे अगदी सहजपणे मला सांगता येतील की ज्यांच्याबरोबर मी कुठल्या ना कुठल्या प्रकारे एकत्र काम केल्याचा अनुभव घेतला आहे. प्रत्येक प्रबोधिनीतला मित्र, प्रत्येक प्रबोधिनीय आत्ता त्यांच्या-त्यांच्या क्षेत्रांत उच्च पातळीवर जात आहेत. ते आपले मित्र आहेत आणि त्यांच्याकडून आपल्याला काहीतरी हक्काने मागता येईल ही भावनाच खूप आश्वासक आहे. कुटुंबामध्ये जर कुणाला काही त्रास झाला तर डॉ. मिलिंद मोडकांशी लगेच

फोन होतो त्यातला जो आश्वासक भाव असतो तो महत्त्वाचा असतो. काही अडचण आली आणि प्रबोधिनीच्या मित्रांना सांगितलं तर प्रत्यक्ष आपण नसतानाही ते आपल्या पाठीशी राहून मदत करतात ही खात्री वाटते.

ज्याला worldly wise म्हणतात ते प्रबोधिनीत मी तसं फार शिकलो आहे असं वाटत नाही. पण त्यामुळे फार काही तोटा झाला असेही वाटत नाही. व्यवहार चतुर असणं आणि व्यवहार समजणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. व्यवहार चातुर्य मला प्रबोधिनीत त्यावेळेस मिळायला हवं होतं असही वाटत नाही. प्रबोधिनीत 'काय शिकायचं' याची पद्धत माहीत झाली. ज्ञानसंग्रह मात्र बाहेर पडल्यावर वाढवायला लागला. इतिहासाचा अभ्यास प्रबोधिनीमध्ये झाला होता. तो फार उपयुक्त ठरला. परंतु तंत्रज्ञानाकडे बघायचा दृष्टीकोन आणि professionalism/व्यावसायिकता नव्याने प्रबोधिनीबाहेर पडल्यावर शिकायला मिळाली. व्यावसायिक असणे किंवा महत्त्वाकांक्षी असणे हे काही वाईट नाही तर त्याचा ही उपयोग होतो हे नव्याने कळलं. अनेक देशांमध्ये प्रवास केल्यानंतर, तेथील निसर्ग, माणसं, चालीरिती, संस्कृती बघितल्यानंतर परत शेवटी हीच भावना मनात आली की 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा!' जे आपल्याकडे आहे ते आपल्याकडेच आहे! कितीही कष्ट असले तरी समाधानी राहण्याची वृत्ती जी आपल्याकडे आहे ती जगामध्ये खूप कमी ठिकाणी बघायला मिळाली. जरी त्रास झाला तरी आपली माणसे ही आपली आहेत ही भावना केवळ आपल्याकडे बघायला मिळते. एखादे काम शिस्तीने कसे करायचे हे पाश्चात्त्य देशांकडून शिकण्यासारखे आहे.

ठरलेले काम ठरलेल्या पद्धतीनेच झाले पाहिजे यासाठीचा आग्रह हा इतर काही देशांकडून शिकण्यासारखा आहे. रशियामध्ये एका शिष्टमंडळाचा भाग म्हणून मी गेलो होतो त्यावेळी पाहिले, की प्रत्येक माणसाला त्याच्या कामाच्या संदर्भात गरजेची तेवढीच माहिती असते. त्या व्यतिरिक्त काही विचारले तर ' sorry, I don't know' असे उत्तर असते. हे चांगले का वाईट हे माहित नाही. परंतु ज्याचे जे काम आहे त्याला त्याची पूर्ण माहिती असणे याचे फायदे काय आहेत हे ही पहायला हवे. धर्म, भूगोल, राजकारण, याच्या पलीकडे जर आपल्यातला माणूस जागा असेल, आणि आपल्याकडचे 'वसुधैव कुटुंबकम्' हे मनात जागं असेल तर जिथे जाऊ तिथे आपले स्वागत होते. असे स्वागत मी खूप मोठ्या प्रमाणावर अनुभवलेले आहे.

### अनेक गुरुतुल्य व्यक्ती

गुरुतुल्य व्यक्तींच्या नावांची यादी खूपच मोठी होईल. यादीची सुरुवात नक्कीच आप्पांपासून होते. त्यांच्याकडून जी वैचारिक बैठक मिळाली ती तेव्हापासून आजपर्यंत, आणि कदाचित या आयुष्याच्या अंतापर्यंत एक मार्गदर्शक बैठक असेल! माझे दुसरे गुरु म्हणजे मी मॉडर्नला असतानाचे तेव्हाचे उपप्राचार्य म्हणून सीताराम रायकर हे होते. आमचा ट्रेकिंगमुळे परिचय वाढत गेला. स्वतःची Ph.D. नसूनही रायकर सर हे अनेक Ph.D. विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक होते. जेव्हा आम्ही बोलायला लागलो, आमचे थोडेसे जुळायला लागले तेव्हा त्यांनी मला दर आठवड्याला एक पुस्तक वाचायला द्यायला सुरुवात केली. तेव्हा खूप वेगवेगळी पुस्तके मी वाचली. त्यामधले एक पुस्तक मी केव्हाच विसरणार नाही ते म्हणजे '5 ideas that changed the world.' मग त्यामध्ये विनोबांची गीताई, विस्टन चर्चिलचे आत्मचरित्र अशा अनेक पुस्तकांमधून ते माझ्या विचारांना पैलू पाडत गेले. मला प्रश्न विचारत गेले. त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यातून मी खूप काही शिकत गेलो. मॉडर्न महाविद्यालयातील प्राध्यापक गोसावी हे ही माझे चार दशकांचे गुरु आहेत. ते मॉडर्न कॉलेजचे प्राचार्य ही होते. प्रबोधिनीत येऊन ही त्यांनी अनेकांना शिकवलेले आहे. वाणिज्य शाखेचे अध्यापक असूनही त्यांची ज्ञानाकडे बघायची पद्धत ही खूप अनोखी होती. त्यामध्ये नेमकेपणा, अचूकता यावर जेवढा भर होता तेवढाच भर हा व्यासंगावर देखील होता. या दोन्ही गोष्टींचे संतुलन ठेवणे हे मला खूप उपयुक्त ठरले.



**मॉडर्न कॉलेजचे निवृत्त प्राचार्य**
**डॉ. अ. गो. गोसावी**

प्रशासकीय सेवेमध्ये भरत ओझा म्हणून एक अधिकारी होते ते अणि मसूरीच्या लाल बहादूर शास्त्री अकादमीचे तेव्हाचे संचालक बी. एन्. युगंधर ही दोन नावे उल्लेख करावा अशी आहेत. युगंधर यांनी कोणत्याही चांगल्या अधिकाऱ्याचे मूल्यमापन करणारे, त्याला आयुष्यात उपयोगी पडणारे दहा गुण सांगितलेले होते. त्यात तुम्ही तुमच्या सुरुवातीच्या कारकिर्दीत काय कराल, नंतर पुढे काय कराल, असे सांगितले होते. त्या दहा मधील सर्वात महत्त्वाची त्यांनी शिकवलेलेली गोष्ट म्हणजे गरिबांबद्दल संवेदनशीलता. ही संवेदनशीलता युगंधर सरांकडून शिकायला मिळाली. पूर्वी पु. स. पाळंदे सरांकडून देखील तेच ऐकले होते. ही संवेदनशीलता आयुष्यात खूप उपयोगी पडली. भरत ओझा यांच्या कडून being a good officer, being an expert आणि being a good person, या तीन गोष्टी शिकायला मिळाल्या. या तिन्ही पातळ्यांवर जास्तीत जास्त चांगला

होण्याचा प्रयत्न करणे हे ही आयुष्यात खूप काही शिकवून गेले. ज्यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे वामनराव अभ्यंकर आणि यशवंतराव लेले, या दोन प्रबोधिनीच्या प्राचार्यांचा! त्यांच्याकडून कायमस्वरूपी स्मरणात ठेवलेले म्हणजे भगवद् गीतेतले दुसऱ्या अध्यायातले ५४ ते ७२ हे श्लोक! त्यामध्ये जे स्थितप्रज्ञ दर्शन मांडलेले आहे, ते श्लोक ही माझे गेल्या अनेक वर्षांतले कायमचे मार्गदर्शक म्हणून राहिलेले आहेत. जेव्हा-जेव्हा कुठेतरी मनावर ताण आला, जेव्हा असं वाटलं आपण बरोबर करत आहोत की नाही, त्यावेळेला काय केले पाहिजे हे या श्लोकांमधून शिकायला मिळाले.

**चिरंतन विकास, प्रशासन व प्रबोधिनीशी माझे नाते**

चिरंतन विकासाला पर्याय नाही. जेव्हा-जेव्हा आपण दुसरा पर्याय निवडला तेव्हा अनेकदा नैसर्गिक आपत्ती वा अन्य संकटांना सामोरे जावे लागले आहे. चिरंतन विकास या संकल्पनेमध्ये 'चिरंतन' हा शब्द महत्त्वाचा आहे आणि 'विकास' तर आवश्यक आहेच. विकास आणि पर्यावरण याचा समतोल साधायचा असेल तर आवश्यक गोष्ट म्हणजे प्रज्ञा किंवा Innovation. परमेश्वराने दिलेल्या बुद्धीचा वापर करून पर्यावरणाचा समतोल टिकवत अधिकाधिक विकसित होणे नक्कीच शक्य आहे असे वाटते. आपल्या अवतीभवती अशी अनेक उदाहरणे आहेत की जिथे विकासाच्या मार्गावर जो ऱ्हास झाला तो भरून काढून पर्यावरणाचा समतोल पुनःश्च साधायचे प्रयत्न यशस्वी झाले आहेत. हे प्रयत्न भविष्यासाठी मार्गदर्शक ठरावे.

भारतबद्दल बोलायचे झाले तर मला त्या बाबतीत एका शहराचे खूप कुतूहल वाटते ते म्हणजे इंदूर. आपण पुण्यात कचरा, पाणी अशा अनेक समस्या पाहतो, तशा अनेक शहरात असतात. पण इंदूरने ज्या प्रकारे या सर्व गोष्टींचे व्यवस्थापन केले आहे त्यातून अनेक शहरांना काहीतरी शिकण्यासारखे आहे. हे केवळ मी एक उदाहरण दिले की जे मी भारतातील बाकी कोणत्याच शहरात पाहिले नाही. जिथे विकास आणि पर्यावरण यात संघर्ष होतोय असे वाटते तिथे प्रत्येक ठिकाणी जगात कुठे ना कुठे हा समतोल कोणी ना कोणी साधलेला आहे अशी उदाहरणे नक्की आहेत, फक्त ते शोधायची गरज आहे. त्या उदाहरणांवरून शिकून आपणास कृती आराखडे तयार करावे लागतील.

लोकसहभागाशिवाय प्रशासन हे फारसे काम करू शकत नाही. लोकसहभागाची पद्धत, माध्यमे ही सतत बदलतात. माझ्या पिढीचे सांगायचे झाले तर परस्पर संपर्काचे अत्यंत प्रभावी माध्यम हे लांबलचक लिहिलेलं पत्र असायचे. कोणी वर्तमान पत्रात एक मोठा लेख लिहिला किंवा एक पत्र प्रकाशित केलं तरी त्याचा बराच परिणाम होत असे. नव्या पिढीमध्ये लेखांपेक्षा सोशल मीडिया किंवा समाज माध्यमांवर फिरणाऱ्या अगदी लहान पण तरीही अत्यंत प्रभावी संदेशामार्फत होत असेल. येत्या काळात या पेक्षा अजून कदाचित वेगळी माध्यमे असतील ज्यामधून लोकसहभाग हा निश्चित करता येईल, योग्य रीतीने समजून घेता येईल आणि योग्य रीतीने सहभागही वाढविता येईल, त्याद्वारे लोकांचे प्रश्न सोडवता येतील. असे मार्ग प्रशासनाला अखंड शोधत रहावे लागतील. प्रशासन तेव्हाच यशस्वी होईल जेव्हा अशा माध्यमांतून प्रशासन खरंच समाजापर्यंत पोचेल. त्यावरून मिळणाऱ्या संदेशांवर अतिशय योग्य, समावेशक, समर्पक असा विचार होईल.

माझे प्रबोधिनीशी जोडले गेलेले नाते या सगळ्या प्रवासात कधी तुटलेच नाही. आप्पा नेहमी असं म्हणत की 'Once a student of Prabodhini is always a student of Prabodhini!'. तसा मी अखंड विद्यार्थी म्हणून राहिलो आहे. माझ्या साडेबत्तीस वर्षांच्या प्रशासकीय सेवेमध्ये मधली सव्वा दोन वर्षे सोडली तर मी पुण्याच्या बाहेरच होतो. त्यामुळे कधी वर्षातून एकदा, कधी एखादा आठवडा असे पुण्यात येणं व्हायचं तेव्हा आवर्जून प्रबोधिनीत यायचा प्रयत्न असायचा. मा. संचालक, गिरीशरावांना भेटणं त्यांच्याशी संवाद साधणे व्हायचे, हे अतिशय आनंदाचे आणि समाधानाचे असायचे. प्रबोधिनीमुळे अनेकजण माझ्या कुटुंबाशी जोडले गेले. प्रदीप व प्रफुल्ल कुलकर्णी, अजित कानिटकर, विवेक कुलकर्णी, राजीव रानडे व सगळेच वर्गमित्र आणि त्यांची कुटुंबे यांच्याशी कायम संबध आहेतच आणि ते दृढ होत राहतात. मी जिथे-जिथे गेलो तिथे-तिथे माझा जेव्हा प्रबोधिनीशी संबंध आला तेव्हा ते ही खरंच आनंददायी असते. अभ्यासदौऱ्या निमित्त कुणीतरी प्रबोधिनीतून आपल्या घरी येते, त्यांच्याशी आपण बोलतो तेव्हा हे नाते म्हणजे जणू आपल्या लहान भावंडांना भेटतोय असे वाटते. हे अखंड असेच सुरू राहणार आहेच.



**प्रफुल्ल व प्रदीप कुलकर्णी यांच्या कुटुंबियांबरोबर**

अजितराव आणि माझे नाते शाळेमध्ये असताना पासून आता जवळ–जवळ ४०–४५ वर्षांचे आहे. परशूराम दल घेत असताना आणि दिल्लीमध्ये असताना आम्ही विविध कारणांनी संपर्कात राहिलो. आमचे नाते मी म्हणेन खऱ्या मित्राचे नाते आहे. अशा मित्रांचे नाते की जिथे परशुराम दलावर ते प्रतोद आणि मी साहाय्यक असताना आम्ही या आठवड्यात अमुक करूयात, पुढच्या आठवड्यात हे करूयात, पुढच्या महिन्यात हे करू, सहा महिन्यात हे करू असे ठरवून अत्यंत उत्साहात आणि जोमानी काम केलेलं आहे. त्यानंतर अजितराव केरळ, नागालँड, इरमामध्ये होते. मी देखील कामानिमित्त विविध ठिकाणी होतो. २००२च्या सुमारास आम्ही दोघेही काही समान काळासाठी दिल्लीमध्ये होतो आणि परत एकदा आमचा संपर्क वाढायला सुरुवात झाली. आयुष्याच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर, जेव्हा हातून काही चांगले झाले तर ते त्यांना सांगावे, त्यांचे जे काही काम सुरू आहे ते आपल्याला कळावे हे स्वाभाविक होऊन गेले. दिल्लीमध्ये आल्यावर त्यांची भेट घ्यायचा आवर्जून प्रयत्न असायचाच. याच्या पलीकडे जाऊन कुठेतरी एक कौटुंबिक पातळीवर देखील आमचा स्नेह आहे. अतिशय प्रेमळपणा आणि त्याद्वारे लोकांना जोडत जाण्याचे त्यांचे कौशल्य हे माझ्यासाठी कायम मार्गदर्शक दिवा बनून राहिलेले आहे. असे प्रबोधिनीमधील अनेक मित्र आहेत ज्यांच्याकडून मी काहीतरी शिकत गेलोय, मात्र अजितरावांचे स्थान हे कुठेतरी व्यक्तिगत आहे. एक मित्र म्हणून आमचे घट्ट बंध निश्चितच दलावर असताना पेक्षाही जास्त दल चालवताना आपण ज्या गोष्टी करतो त्या कार्यपद्धतींमधून, स्नेह वाढवण्याच्या ओढीतून हे नाते निर्माण झाले आणि ते टिकले.



**अजित व ज्योती कानिटकर,**
**सुषमा आणि सत्यम दाढे, विवेक व निधी वाडेकर यांच्या समवेत**

**तरुण प्रबोधकांविषयी**

नवीन तरुण प्रबोधकांना काही संदेश वगैरे देण्याइतपत मी काही मोठा मुळीच नाही. प्रत्येकाने आपापले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व जोपासावे, पण एक बाजूला हे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व जोपासताना आपण एका मोठ्या कुटुंबाचा आणि एका विचारधारेचा भाग आहोत हे विसरून चालणार नाही. ज्या प्रबोधिनीने आपल्याला समाजाचे ऋण पाहायला, ओळखायला शिकवले आहे, ते फेडण्याचा अखंड प्रयत्न आपण आपापल्या पद्धतीने करीत रहावा अशी अपेक्षा मात्र मनी जरूर बाळगाविशी वाटते. जेव्हा असे करू तेव्हाच आपण प्रबोधिनीचे विद्यार्थी असू. आपण प्रार्थनेत म्हणतो 'की घेतले व्रत न हे आम्ही अंधतेने..' तर हे सतीचे वाण आपण घेतले पाहिजे, पेलले पाहिजे तरच आपण उपासनेतल्या 'शुध्यंताम्' पर्यन्त पोचू शकू असे वाटते. एकमेकांना साथ देत, मदत करत एकत्र मोठ होत रहावं असं वाटतं. कोणतीही एक व्यक्ती मोठी होण्यापेक्षा आपण सगळे मिळून मोठे होणं हे जास्त महत्त्वाचे आहे. ही संघभावना जर आपण जोपासत राहिलो तर खऱ्या अर्थाने प्रबोधिनीय म्हणून आपण स्वत:मध्ये आणि आपल्या कार्यामध्ये काहीतरी योगदान करू शकू असे वाटते.

प्रशासनात येऊ इच्छिणाऱ्या तरुण प्रबोधकांनी प्रबोधिनीचे काम प्रशासनामार्फत सुरू ठेवावे. प्रशासन हे शेवटी माणसांचेच बनलेले असते हे लक्षात ठेवून आपल्याला प्रबोधिनीमध्ये जे नेतृत्वगुण शिकायला मिळाले आहेत त्या नेतृत्वगुणांना कुठेतरी सहभावनेची आणि सद्भावाची जोड देत जास्तीत–जास्त लोकांसोबत पुढे जात–जात आपला ठसा आपल्या आणि इतरांच्या नकळत पण स्पष्ट उमटावा अशी स्वप्नं बघावीत असे नक्की वाटते.

ज्ञान प्रबोधिनी ही आपल्या सर्वांसाठी केवळ एक संस्था नसून ते एक कुटुंब आहे. एक असे प्रेरणास्थान आहे की जे आपल्याला आपल्या क्षेत्रात, आपल्या आयुष्यात सतत प्रगती करण्याची प्रेरणा देते आणि त्याच बरोबर इतरांच्या प्रगतीमधूनही आपल्याला आनंद देते. राष्ट्रार्थ भव्य पराक्रमाची कृती करताना आपण मानवतेला श्रेष्ठतर करण्याची स्वप्ने पहावीत, अशी स्वप्ने सत्यात यावी म्हणून आयुष्यभर झटावे व आपल्या पुढील पिढीसाठी एक दीपस्तंभ बनावे. असे दीपस्तंभ बनून कृतार्थ व्हावे हे माझे स्वप्न आहे. तरुण प्रबोधकांचेही असावे.

## RAPID FIRE

१. आवडतं पुस्तक – In search of Ethical leadership – R. M. Lala, स्वामी – रणजीत देसाई
२. आवडता चित्रपट – गांधी
३. आवडते ठिकाण – सिंहगड
४. छंद – वाचन, चांगले संगीत ऐकणे
५. एका शब्दात/वाक्यात वर्णन करा.
- ऑडिट – वस्तुनिष्ठ
- चिरंतन विकास – आयुष्याची दिशा
- भारत – मनाने समृद्ध देश
- आप्पा – ऋषित्व
- ज्ञान प्रबोधिनी – सर्वकाही

६. पुन्हा हे आयुष्य जगायची संधी मिळाली तर?
- कुठेतरी खूप सेवाभावी अशा संस्थेमध्ये आयुष्य वाहून द्यायला आवडेल.

**सुनील दाढे**
**9422517982**
**sunildadhe@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org